पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. ब प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक १
सभावृत्तांत

दिनांक – ०६/०४/२०१६

वेळ : सकाळी ११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ब" प्रभाग समितीची विशेष सभा बुधवार, दिनांक ०६/०४/२०१६ रोजी सकाळी ११.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील मा. महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. प्रेरणा देशभ्रतार, पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
२. मा. शमीम पठाण (पठाण बाई)
३. मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव
४. मा. डोके अपर्णा निलेश
५. मा. साबळे छाया जगन्नाथ
६. मा.कलाटे स्वाती मयुर

याशिवाय श्री. सुभाष माछरे , क्षेत्रीय अधिकारी, श्री.रविंद्र जाधव , प्रशासन अधिकारी, "ब" क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

-------

**अतिरिक्त मनपा आयुक्त पुणे महानगरपालिका - (पिठासीन अधिकारी)**

सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी,उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या सभेचा सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता मा."ब" प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मा. "ब" प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करते.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा)**

मा. "ब" प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकाच उमेदवाराचे एकूण २ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सूचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | मा. छाया जगन्नाथ साबळे | मा. जयश्री वसंत गावडे |
| २ | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | मा. अपर्णा निलेश डोके | मा.शमीम पठाण (पठाणबाई) |

मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा. पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.

**अतिरिक्त मनपा आयुक्त पुणे महानगरपालिका - (पिठासीन अधिकारी)**

मा. "ब" प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एकाच उमेदवाराची उपरोक्त एकूण २ नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असून ती २ नामनिर्देशन पत्रे वैध ठरविण्यात आलेली आहेत.

त्यामध्ये मा. "ब" प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर ह्या एकच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार आहेत.

त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी ११.३५ ते ११.५० असा १५ मिनीटांचा कालावधी देण्यात आला. सदर कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी माघारीचा अर्ज दिला नाही.

**अतिरिक्त मनपा आयुक्त पुणे महानगरपालिका - (पिठासीन अधिकारी)**

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता मा."ब" प्रभाग समिती पिठासीन पदाची निवडणूक लढविणारे **मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यामुळे **मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ब" प्रभाग समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

**( प्रेरणा देशभ्रतार)**
**पिठासीन अधिकारी तथा**
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे**

ठराव क्रमांक – १

दिनांक – ०६/०४/२०१६

विषय क्रमांक – १

विभाग – प्रशासन विभाग,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता करीता मा."ब" प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या २(दोन) नामनिर्देशन पत्रामधील मा. "ब" प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ब" प्रभाग समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

यानंतर मा.पिठासन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( प्रेरणा देशभ्रतार)**
**पिठासीन अधिकारी तथा**
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे**

**तदनंतर मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर** यांनी सभेचे सभापती पदाचे स्थान स्विकारले.

-----

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८**
**मा.ब प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक १**

ठराव क्रमांक २
दिनांक ०६/४/२०१६
सुचक :- मा.शमीम पठाण (पठाण बाई)

विषय क्रमांक २
विभाग – प्रशासन विभाग,
अनुमोदक :- मा. डोके अपर्णा निलेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ब प्रभाग समिती सभेचा दिवस दर महिन्याचे दुस-या बुधवारी दुपारी १२.३० वाजता व सार्वजनिक सुटटी आल्यास सुटटीच्या दुस-या दिवशी दुपारी १२.३० वाजता किंवा मा.ब प्रभाग समिती सभापती निश्चीत करतील त्या दिवशी ब क्षेत्रीय कार्यालयामधील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे निश्चित करण्यात येत आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर)**
**सभापती**
**ब प्रभाग समिती**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब क्षेत्रीय कार्यालय चिंचवड ३३
जा.क्र.बक्षेका/२/सभा/कावि/१७८/२०१६,
दिनांक ०६/०४/२०१६

**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव सभा शाखा**
**ब प्रभाग समिती**

प्रत :- सर्व संबंधीत विभाग प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.